
दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १५ वे ● अंक ४० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.३ मे २०२० ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पनवेलमध्ये कोरोनाचे ९ नवीन रुग्ण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सलग चौथ्या दिवशी पनवेल परिसरात कोरोनाचे रुग्ण वाढताना दिसत आहेत. शनिवारी त्यामध्ये आणखी नऊ जणांची भर पडली. कामोठे वसाहत पूर्णपणे कोरोना विषाणूंच्या हिट लिस्टवर असल्याचे या आकड्यावरून दिसू लागले आहे. एकाच कुटुंबातील आई व दोन मुलांना संसर्ग झाला आहे. वसाहतीत नव्याने सात रुग्ण आढळून आले. तर कळंबोली आणि नवीन पनवेल मध्ये प्रत्येकी एक रुग्ण सापडला. विशेष करून या अगोदरच्या कोरोना पॉझिटिव्ह रुग्णां मुळे त्यांच्या घरातील सदस्यांना ही लागण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. यामुळे हे संक्रमण पुढेही वाढेल की काय अशी भीती व्यक्त होत आहे.

कामोठे सेक्टर – ७ येथील २३ वर्षीय १ व्यक्ती कोव्हिड – १९ पॉझिटिव्ह आ–लेली आहे. सदर व्यक्तीचे वडील बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये सफाई कामगार म्हणून कार्यरत आहेत. त्यांना या अगोदर या आजाराची



लागण झाली आहे. कामोठे सेक्टर – १९ येथील ३२ वर्षीय महिलेला कोरोनाचा संसर्ग झाला आहे .सदर महिला सेंट जॉर्ज हॉस्पीटलमध्ये स्टाफ नर्स म्हणून कार्यरत आहे. सदर महिलेला कामाच्या ठिकाणीच संसर्ग झाल्याचा प्राथमिक निष्कर्ष आहे. कामोठे सेक्टर – २१ येथील एकाच कुटुंबातील ३३ वर्षीय १ महिला तसेच त्यांची ७ वर्षीय व १ वर्षीय असे २ मुले कोव्हिड – १९ पॉझिटिव्ह आलेले आहेत. त्यांचे कुटुंब प्रमुख हे यु एस व्ही फार्मा कंपनी, गोवंडी येथे कस्टम मॅनेजर म्हणून कार्यरत असून ते यापूर्वी कोव्हिड – १९ पॉझिटिव्ह आलेले होते. त्यांच्या पासूनच त्यांना संसर्ग झाल्याचा प्राथमिक निष्कर्ष आहे. कामोठे सेक्टर – ११ येथील ३२ वर्षीय १ महिलेला कोरोनाची लागण झालेली आहे. त्यांचे भाऊ बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये सफाई कामगार म्हणून कार्यरत असून ते यापूर्वी कोव्हिड – १९ पॉझिटिव्ह आलेले होते.

कामोठे सेक्टर – ३४ येथील ३६ वर्षीय १ व्यक्तीला कोरोना चा संसर्ग झाल्याचे उघड झाले आहे. हा रुग्ण सुद्धा गोवंडी येथील फार्मा कंपनीत असिस्टंट मॅनेजर म्हणून कार्यरत आहे. कळंबोली सेक्टर – ४ येथील ३५ वर्षीय १ व्यक्ती कोव्हिड – १९ पॉझिटिव्ह आलेली आहे. या रुग्णाचा भाऊ पोलिस कर्मचारी त्यांना अगोदरच कोरोना झाला आहे. नवीन पनवेल सेक्टर – १७ येथील २२ वर्षीय व्यक्तीला सुद्धा लागण झाली आहे. सदर महिला मेंदू विकार तपासण्यासाठी सायन हॉस्पीटल, मुंबई येथे गेली होती. त्या ठिकाणीच त्यांना संसर्ग झाल्याचा प्राथमिक निष्कर्ष आहे.

# राज्यात आज ७९० नवीन कोरोनाबाधित रुग्णांची भर

## आतापर्यंत २000 रुग्णांना डिस्चार्ज

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात आज कोरोनाच्या ७९० नवीन रुग्णांची नोंद झाली. एकट्या मुंबईत ५५९ कोरोनाबाधित रुग्ण आढळले आहे. त्यामुळे राज्यातील कोरोनाबाधितांची संख्या १२,२९६ झाली आहे. दिलासादायक बाब म्हणजे आज १२१ रुग्ण बरे होऊन घरी गेले. तर राज्यात आतापर्यंत एकूण २००० कोरोनाबाधित रुग्ण बरे झाले आहेत.

आज ३६ कोरोनाबाधित रुग्णांचा मृत्यू झाला आहे. आज झालेल्या मृत्यूंपैकी मुंबई मधील २७, पुणे शहरातील ३, अमरावती शहरातील २, तर वसई विरारमधील १, अमरावती जिल्ह्यामधील १ त औरंगाबाद महापालिका क्षेत्रातील १ जण आहे. याशिवाय पश्चिम बंगालमधील एका जणाचा मुंबईत मृत्यू झाला आहे.

आज झालेल्या मृत्यूंपैकी २८ पुरुष आहेत तर ८ महिला आहेत. आज झालेल्या ३६ मृत्यूपैकी ६० वर्षे किंव त्यावरील १९ रुग्ण आहेत. तर १६ रुग्ण हे ४० ते ५९ वयोगटातील आहेत. तर एक जण ४० वर्षांखालील आहे.

यापैकी ३ जणांना इतर आजारांबद्दलची माहिती मिळाली नाही. तर उर्वरित ३३ जणांपैकी २३ जणांमध्ये मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग, अशा स्वरुपाचे अतिजोखमीचे आजार आढळले आहेत.

## प्रसिद्ध गणेश मूर्तीकार विजय खातू यांच्या कार्यशाळेला आग

**दै.रायगड नगरी । मुंबई**

प्रसिद्ध गणेश मूर्तीकार विजय खातू यांच्या मुंबईतील चिंचपोकळी येथील गणेश मूर्ती कार्यशाळेत आज, रात्री भीषण आग लागली. सुदैवानं कार्यशाळेत सध्या कुणी नसल्यानं जीवितहानी टळली.

गणेश मूर्तींसाठी जगभरात ख्याती असलेले मुंबईतील प्रसिद्ध गणेश मूर्तीकार विजय खातू यांची चिंचपोकळी रेल्वे स्थानकाजवळ गणेश मूर्ती कार्यशाळा आहे. या कार्यशाळेत आज, रात्री भीषण आग लागली. काही वेळानं आ–गीनं रौद्ररुप धारण केलं. सध्या लॉकडाऊन असल्यानं गणेश मूर्ती कार्यशाळेत कुणीही नव्हतं. त्यामुळं जीवितहानी टळली. मात्र,



या आगीमुळं कार्यशाळेचं मोठं नुकसान झालं आहे. या घटनेची माहिती मिळताच, अग्निशमन दलाचे जवान अग्निशमन बंबासह घटनास्थळी पोहोचले. त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवलं. दरम्यान, शॉर्ट सर्किटमुळं आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

## उरण- मोरा येथील मुंबईत कर्तव्यावर असलेल्या पोलिस शिपायासह पत्नीला कोरोनाची लागण

**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण** : उरण तालुका कोरोनामुक्तीच्या दिशेने वाटचाल करीत असतानाच मोरा – उरण येथे वास्तव्य करून असलेल्या ३७ वर्षीय पोलिस शिपाई कोरोना बाधित आढळून आला असून, त्याच्या संपर्कात आलेल्या ९ जणांना कॉरंटाईन आले होते. त्यापैकी त्याची पत्नीचा तपासणी अहवाल कोरोना बाधित आला आहे.

मुंबई पोलिस दलात कार्यरत असलेल्या या शिपायाला उरण – मुंबई प्रवासा दरम्यान संपर्कातुन कोरोनाचा संसर्ग झाला असल्याचा प्राथामिक निष्कर्ष काढण्यात आला आहे. तर पोलिस शिपायांच्या संपर्कात आलेल्या त्याच्या पत्नीलाही कोरोनाची लागण झाल्याचे चाचणी तपासणीच्या अहवालात आल्याने उरणमध्ये आत्ता अधिक भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

तापामुळे कामोठे येथील एमजीएम हॉस्पिटलात २८ एप्रिल २०२० रोजी या पोलिस शिपायाला दाखल करण्यात आले होते. २९ एप्रिल रोजी स्वॅबटेस्ट नंतर मात्र काल ३० एप्रिल २०२० रोजीच्या तपासणीत रिपोर्ट कोरोना बाधित आला आहे. मोरा येथे वास्तव्य करणारे पोलिस शिपाई मुंबईत एका पोलिस ठाण्यात ड्युटी दरम्यान प्रवास करीत होते. या प्रवासा दरम्यान कोरोनाचा संसर्ग झाला असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्याच्या पत्नीला कॉरंटाईन करण्यात आल्याने दोन दिवसांनी काल २ मे २०२० रोजी पत्नीला कोरोनाची लागण झाल्याचे स्पष्ट आहे.

दरम्यान उरणमध्ये लॉकडाऊन दरम्यानच्या कालावधीत कोरोनाचे चार रुग्ण आढळले होते. उपचारानंतर चार पैकी तीन रुग्ण ठणठणीत बरे होऊन घरी परतले आहेत. उर्वरित एक

..../२

# आरोग्य विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची राहण्याची व्यवस्था होणार कामाच्या ठिकाणीच


## पालकमंत्री आदिती तटकरे यांनी शासनाला केलेली विनंती मान्य

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कोरोना विषाणूच्या प्रादूर्भावामुळे सध्या राज्यात संपूर्ण लॉकडाऊन सुरु आहे. या लॉकडाऊन काळात पनवेल व नवी मुंबई येथून मुंबईत अत्यावश्यक सेवा कर्तव्यावर असलेल्या आरोग्य विभागातील डॉक्टर्स, नर्सेस, अधिकारी, कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणीच राहण्याची सोय करण्यात येणार आहे. राज्यमंत्री तथा रायगड जिल्हा पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी शासनाला याबाबत विनंती केली होती.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील करोना विषाणूबाधित व्यक्तींची माहिती घेतली असता प्रामुख्याने त्यामध्ये मुंबईत अत्यावश्यक सेवेत असणारे व पनवेल परिसरातून रोज ये–जा करत असणारे अधिकारी व कर्मचारी असल्याने एकंदरीतच करोना विषाणूची बाधा त्यांना त्यांच्या अत्यावश्यक सेवेच्या ठिकाणी झाल्याचा निष्पन्न झाले.

या पार्श्वभूमीवर याविषयी तातडीने निर्णय घेण्याविषयीची विनंती जिल्ह्याच्या पालकमंत्री तसेच राज्यमंत्री, उद्योग व खनिकर्म कु. आदिती तटकरे यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,



मुंबई, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका मुंबई यांना लेखी पत्राद्वारे पनवेल व नवी मुंबई परिसरातील वाढता करोना विषाणूचा प्रादूर्भाव पाहाता या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या आरोग्याच्या हिताच्या दृष्टीने त्यांना अत्यावश्यक सेवेतून काही प्रमाणात वगळणे किंवा त्यांच्या मुंबईतील अत्यावश्यक सेवेच्या ठिकाणीच राहण्याची व्यवस्था करण्याबाबत विनंती केली होती.

त्याअनुषंगाने मुंबई येथे अत्यावश्यक सेवेत काम करणाऱ्या डॉक्टर्स, नर्सेस, अधिकारी व कर्मचारी यांना कामाच्या ठिकाणीच नजीकच्या हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था करण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने घेतला आहे.

## करंजाडे परिसरात कर्फ्यू ; दुकाने, बाजारपेठेत कडकडीत बंद



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर करंजाडे वसाहतीमध्ये शुक्रवार ता.१ व शनिवार ता.२ रोजी जनता कर्फ्यू पाळण्यात आला आहे. यावेळी वसाहतीमध्ये जनता कर्फ्यू पाळण्यात आल्याने सर्वत्र शुकशुकाट पहायला मिळाला. हॉस्पिटल, मेडिकल्स दुकाने वगळता बाजारपेठ दोन दिवस कडकडीत बंद होती. काही मेडिकल व्यावसायकांनी बंद ठेवत या कर्फ्यूला पाठिंबा दिला होता.

संपूर्ण देशात संचारबंदी कायदा लागू असतानाही जीवनावश्यक वस्तुंच्या खरेदीच्या निमिताने करंजाडे ग्रामपंचायत हद्दीतील नागरिक बिनधास्तपणे दिवसभर रस्त्यावर फिरत असुन विविध दुकानांवर मोठ्या प्रमाणावर गर्दी करत असल्याचे चित्र दिसून येत आहे. कोरोना या आजाराला थांबविण्यासाठी आपण स्वतः घरात थांबणे आवश्यक आहे. मात्र शासन नियमानुसार जीवनावश्यक वस्तूंची दुकाने सुरु असल्याने नागरिक खरेदीच्या निमित्ताने घराबाहेर पडतात. त्यामुळे शहराबरोबरच वसाहतीच्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात टाकत आहात. त्याचबरोबर मुंबई, नवी मुंबई तसेच पनवेल परिसरातील कोरोना रुग्णांचे वाढते प्रमाण पाहता

..../२

## पनवेल शहर पोलिसांनी केली गावठी दारूची हातभट्टी छापा टाकून नष्ट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजने अंतर्गत पनवेल शहर पोलिसांनी शनिवारी पहाटे पाडेघर गावाच्या हद्दीतील जेडब्लूआर गोडाऊनजवळील झोपडपट्टीत शासनाच्या आदेशाचा भंग करून गावठी दारूची हातभट्टी वरिष्ठ पोलिस निरीक्षक अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने नष्ट केली आहे.

पाडेघर गावाच्या हद्दीतील जेडब्लूआर गोडाऊनजवळील झोपडपट्टीत शासनाच्या आदेशाचा भंग करून गावठी दारूची हातभट्टी लावण्यात येत असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक अजयकुमार लांडगे यांना मिळाली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.पो.नि. निलेश राजपूत, पो.उपनि. विश्वासराव बाबर, पो.ना. बिन्नर, पो.शि.



आव्हाड, महिला पो.शि. भाग्यश्री भोईर आदींच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून चुलीवर गावठी हातभट्टी तयार करीत असताना एक इसम मदन गोवारे (वय–५०) याच्यासह प्रतिभा गोवारी (वय–४५), श्रीमती मनप्पा मेघावत (वय–३०), श्रीमती कविता चव्हाण (वय–३०), श्रीमती ललिता चव्हाण

..../२

## मार्केटमधील गर्दीच्या नियोजनाकरिता व्यापारी प्रतिनिधींसोबत चर्चा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर उरण नाका ते टपाल नाक्यादरम्यानच्या मार्केट परिसरातील बेबंद गर्दीचे नियोजन करण्याकरिता आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह महापालिका आयुक्त गणेश देशमुख, सभागृह नेते परेश ठाकूर आणि व्यापारी प्रतिनिधींची नुकतीच सविस्तर बैठक झाली.

टपाल नाका ते उरण नाका परिसरातील गर्दीमुळे सोशल डिस्टन्सिंगचा पूर्णपणे फज्जा उडाला आहे. या गर्दीवर कोणतेही नियंत्रण नसल्यामुळे तसेच कोरोनासंदर्भामधील गंभीरता सर्वसामान्य लोकांना कळत नसल्यामुळे आवश्यक ती काळजी घेतली जात नाही. त्यामुळे या गर्दीवर नियंत्रण मिळविण्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली,

..../२

## रूग्ण सेवेत हलगर्जीपणा करणाऱ्यांना घेतले धारेवर

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील आदिवासी प्राथमिक आरोग्य केंद्र असलेल्या आंबिवली मध्ये रूग्ण सेवेत केले जाणाऱ्या हलगर्जी–पणा बद्दल आरोग्य सभापती सूधाकर घारे यांनी चागंलेच धारेवर घेत, झाडाझडती घेतली तर सतत गैरहजर राहणाऱ्या आरोग्य अधिकारी यांना सेवा कर्तव्य चोख बजावणे बाबत समज दिली.

रजपे येथील हर्षदा बाळू घुडे ह्या तरुणिला वादळी वा–यात घरावरील पत्रे उडून पायाला मार लागल्या मुळे तिला उपचारासाठी आंबिवली प्राथमिक आरोग्य केंद्रात आणली असता तीच्यावर उपचार न करता डॉ. पराग भानुशाली यांनी येथे उपचारासाठी औषध नाही असे सांगून तिच्यावर उपचार न करता पूढे घेउन जाणे बाबत सूचवले, संचारबंदी मुळे पुढे जाण्याची अडचण आहे. त्यामुळे आंबिवलीमध्ये च उपचार करावे अशी विनंती सामाजिक कार्यकर्ते प्रमोद पिगंळे, माजी सरपंच हरेश घुडे यांनी केली पण आरोग्य आधिकारी

..../२

## कोरोना प्रतिबंधक उपाययोजनांचे पालन करीत पावसाळ्यापूर्वीची कामे सुरु करण्यास जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हा प्रशासनाकडून लॉकडाऊन कालावधीच्या अनुषंगाने दि.२० एप्रिल पासून काही बाबी, उपक्रम चालू करण्यास परवानगी देण्यात आलेली होती. याशिवाय पावसाळ्यापूर्वीच्या कामांची सुरुवात करण्यासही जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी यांनी परवानगी दिली आहे.

पावसाळ्यापूर्वी करावयाच्या अत्यावश्यक स्वरूपाच्या कामकाजासाठी परवानगी देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून MMR Region मधील तालुक्यांसाठी उपविभागीय अधिकारी व इतर क्षेत्रांसाठी संबंधित तहसिलदार यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. पावसाळ्यापूर्वी करावयाच्या कामांना आवश्यक साहित्य जसे की सिमेंट, खडी, स्टील, हार्डवेअर इत्यादी वस्तूंची आवश्यकता असल्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अर्ज प्राप्त होत आहेत. हे साहित्य उपलब्ध होण्यासाठी अशा प्रकारची साहित्य निर्मिती करणारे कारखाने व अशा प्रकारचे साहित्य पुरविणारे ठोक व किरकोळ विक्रेते अशी संपूर्ण पुरवठा साखळीशी संबंधित दुकाने उघडणे आवश्यक आहे.

याकरिता पावसाळ्यापूर्वीची अत्यावश्यक कामे करण्यासाठी सिमेंट, खडी, डांबर, आर.एम.सी. प्लँट, लोखंड पुरवठादार, हार्डवेअर इत्यादी, पावसाळ्यापूर्वीची

..../२

# माणुसकीचे दर्शन

करोना बाधितांच्या संख्येत भौमितिक श्रेणीने होणारी वाढ आणि मृतांचा वाढता टक्का यांमुळे संकटाचे ढग अधिकाधिक काळेकुट्ट होत असताना, माणुसकीचे दर्शन घडविणाऱ्या विविध घटनांची रूपेरी किनार मात्र खरोखरीच दिलासादायक आहे. करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जगभरातील डॉक्टर आणि त्या त्या देशांतील, राज्यांतील प्रशासन प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असले, तरी संपूर्ण जगावरच निराशेचे मळभ दाटून आले आहे. अतिसूक्ष्म विषाणूपुढे आपण हतबल ठरत असल्याची भावना सर्वत्र आहे. प्रतिबंधक लशीच्या निर्मितीसाठीचे संशोधन गतिमान होत असल्याच्या, परिणामकारक औषधनिर्मितीसाठी पावले पडत असल्याच्या आणि अनेक रुग्ण ठणठणीत बरे होऊन घरी जात असल्याच्या बातम्यांनी आशेचे किरण जरूर निर्माण होत आहेत; परंतु निराशा कमी होताना दिसत नाही. उलट लॉकडाउनचा वाढलेला कालावधी, ठप्प झालेले अर्थव्यवहार, त्यामुळे वाढलेला बेरोजगारीचा धोका यांमुळे परिस्थिती आणखी चिंताजनक बनते आहे. अशा स्थितीत अडचणीत आलेल्या अनेकांसाठी, लाखो गोरगरिबांसाठी, अडकून पडलेल्या स्थलांतरितांसाठी–विद्यार्थ्यांसाठी, रुग्णालये सुसज्ज व्हावीत यासाठी मदतीचे हजारो नव्हे, लाखो हात पुढे येत आहेत आणि माणुसकीचे नाते अधिक घट्ट होत आहे. एकीकडे डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचारी बाधितांवर उपचार करण्यासाठी स्वत:चा जीव धोक्यात घालून रात्रंदिवस काम करीत आहेत; त्यांच्याच जोडीने प्रशासकीय अधिकारी–कर्मचारी, पोलिस, औषध विक्रेते, किराणा आणि भाजी विक्रेते, वीज कर्मचारी, घरोघरी सिलिंडर पोहोचविणारे, अन्न पोहोचविणारे अनेक जण धोका पत्करून अत्यावश्यक सेवा बजावत आहेत. दुसरीकडे अनेक सेवाभावी संस्थेचे, सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते मदतीसाठी पुढे सरसावत माणुसकीचे प्रात्यक्षिकच देत आहेत. करोनाचे संकट परतावून लावण्यासाठीच्या निधीत बडे उद्योगपती कोट्यवधी रुपयांची देणगी देत आहेत आणि त्याचबरोबर सोलापूरच्या आराध्यासारखी सात वर्षांची चिमुरडीही मदतीचा आपला वाटा उचलत आहे. तिच्यापासून प्रेरणा घेऊन ठाण्याच्या तनिष्का कदमसारखी मुलगी वाढदिवसाची रक्कम देऊ करीत आहे. अवघ्या मानवजातीसमोरच संकट उभे ठाकलेले असताना, प्रत्येक जण आपापल्या परीने करीत असलेली ही मदत म्हणजेच मानवधर्माचा खरा आविष्कार. करोनाच्या या साथीत दिसणारी ही माणुसकी उमेद वाढविणारी आहे. पुण्यात अत्यावश्यक सेवेसाठी पीएमपीची बस वाहतूक सुरू आहे. प्रसूतिवेदना होत असलेल्या गर्भवतींसाठी पीएमपीची बसच ॲम्ब्युलन्स झाल्याची घटना दोनदा घडली. प्रसूतीसाठी ॲम्ब्युलन्स किंवा रिक्षाची प्रतीक्षा करीत असलेली महिला पाहून, तिची विचारपूस करून खास तिच्यासाठी रुग्णालयात बस नेण्याचे दोन प्रसंग घडले आहेत. पीएमपीच्या चालक आणि वाहक या महिलांसाठी जणू देवदूत बनून धावले. देशात लॉकडाउन जाहीर झाल्यानंतर लाखो स्थलांतरित कामगार अडकून पडले. त्यांच्या मदतीसाठीही तरुण मंडळी धावत असल्याचे चित्र आहे. छोट्या–छोट्या गावांत, तसेच हाउसिंग सोसायट्यांतूनही संघटितरीत्या मदतीचे प्रयत्न होत आहेत. मास्क, सॅनिटायझर यांच्या जोडीने आरोग्यासाठीच्या अनेक बाबी गरजूंना दिल्या जात आहेत. चांगुलपणाच्या या सर्व घटना आणि प्रसंग मानवधर्म वाढविणाऱ्या आहेत. संकट काळातही स्वार्थ पाहणारे, अत्यावश्यक सेवा देणाऱ्यांना त्रास देणारे समाजकंटक असतात. साठेबाजी करणारेही असतात. अशांच्या कारवायांच्या घटनाही गेल्या काही दिवसांत घडल्या आहेत. माणुसकीला काळिमा फासणाऱ्या घटना तुलनेने कमी असल्या, तरी करोनाच्या महामारीत त्या पूर्णपणे नाहीशा झाल्या नाहीत, ही दुर्दैवी बाब आहे. पोलिसांना मारहाण करण्याच्या घटना काही ठिकाणी घडल्या, तर डॉक्टरांना मारहाण करण्याचे प्रसंगही घडले. या प्रसंगांतील व्यक्ती विवेकशून्य आणि माणुसकीशून्य आहेत. लॉकडाउनचे नियम धाब्यावर बसवून मोकाट फिरणारेही आहेत. या सर्वांना योग्य ती शिक्षा करण्यासाठी कायदा आहे. त्यामुळे त्यांची फारशी चर्चा न करता, माणुसकीचे दर्शन घडविणाऱ्यांबद्दल अधिक बोलायला हवे. यातून इतरांना प्रेरणा मिळू शकते. गोरगरिबांना, रोजगार गेलेल्यांना, रस्त्यावर अडकून पडलेल्या कष्टकऱ्यांना सावरण्यासाठी हजारो नव्हे, तर लाखो हात पुढे येण्याची गरज आहे. 'देणाऱ्याचे हात हजारो, दुबळी माझी झोळी' अशी परिस्थिती खरोखरीच निर्माण होणे गरजेचे आहे; कारण करोनानंतरचे जग वेगळे असणार आहे. बेरोजगारीचे संकट गहिरे होण्याची शक्यता अर्थतज्ज्ञ आताच व्यक्त करीत आहेत. अशा वेळी माणुसकीच जगाला सावरू शकणार आहे. संपन्न वर्गाने विपन्न वर्गाला उभारी देण्याची सर्वाधिक गरज त्यावेळी भासणार आहे. लॉकडाउनच्या काळात दोन वेळचे जेवण देण्यापुरते किंवा मास्क आणि सॅनिटायझर वितरित करण्यापुरतेच सामाजिक कार्य मर्यादित ठेवून चालणार नाही. करोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर अर्थव्यवस्थेला उभारी देण्याचे आव्हान अधिक मोठे असणार आहे आणि ते पेलण्यासाठी माणुसकीची वीण अधिक घट्ट करण्याशिवाय पर्याय नाही.

# मातीने बुजलेला नाला साफ, वेणगाव पर्यंत पाणी पोहचले, लॉकडाऊनचा असाही सदुपयोग!

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील वेणगाव मधील तरुणांनी लॉक डाऊनचा सदुपयोग करून २५ दिवसाच्या कालावधीत श्रमदान करून पाणी वेणगाव पर्यत आणले आहे. आता या गावातील पाण्याचा प्रश्न दूर झाला आहे, सर्वच गोष्टीसाठी शासनावर अवलंबून न राहता मनाच्या जिद्दीवर, एकीने आणि सर्वांच्या श्रमदानातून हे शक्य आहे. या कामावरून या तरुणांनी सर्वांना दाखवून दिले आहे.



कर्जत तालक्याला लाभलेले वरदान म्हणून राजानाला कालव्याचे नाव आहे, राजानाला कालव्याच्या पाण्यावर उन्ह–ाळी भातशेती किंवा कडधान्य पिकवली जातात, हे पाणी पूर्वी कर्जत नगरपरिषद क्षेत्राजवळील काही गावापर्यत येत होते कालांतराने छोटे कालवे मातीने बंद झाले आणि कालव्याच्या पाण्यावर सिंचन होणारे क्षेत्र कमी कमी होत गेले.याकडे मग शासनाबरोबर नागरिकांचे दुर्लक्ष झाले.

वेणगाव हे रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील सुमारे दोन ते अडीच हजार वस्ती असलेले गाव बोरिंग वगळता पाण्यासाठी अन्य कोणताही नैसर्गिक सोर्स नाही. १० –१२ वर्षापूर्वी टाटा पॉवर हाऊस चे पाणी गावातील छोट्याश्या बंधा–याला आडवून ते मार्च, एप्रिल पर्यंत पाणी असायचे. राजानाला कालव्याची दुरुस्ती सुरू झाल्यानंतर पाणी येणे बंद झाले. पाणी उपलब्ध नसताना सुद्धा खोल बोरवेल मारून इमारती उभ्या राहिल्या. परिणामी फेब्रुवारी महिन्यातच बोरवेल कोरडया पडू लागल्या. अश्यातच करोना मुळे लॉग डाऊन सुरू झाला. गावातील काही तरुणाच्या मनात १०/१२ वर्षपूर्वी लुप्त झालेला नाला पुन्हा बंधाऱ्या पर्यंत आणता येईल का? या बाबत विचार सुरू झाला. त्याला ग्रामपंचायत सरपंच अभिषेक गायकर यांचीही साथ मिळाली. साधन सामग्री फारशी नाही त्यामुळे वर्गणी काढून, कधी रात्र दिवस स्वतः हातात फावडे, कुदळ घेऊन, कधी आती आवश्यकता असेल तर जेसीबी घेऊन, नाला सफाईला सुरुवात झाली.

हाती कमी दिवस होते नंतर नाल्याचे पाणी बंद होणार होते. नया दौर चित्रपटा प्रमाणे साथी हात बढाना या गीताप्रमाणे अखेर गंगा अवतरली.आणि बंधारा भरला. ३० दिवसांपेक्षा कमी दिवसात सुमारे २.५ किलोमीटर नाला साफ झाला. लॉक डाऊन चा असा सदुपयोग केल्याबद्धल सर्व तरुणाचे अभिनंदन होत आहे, सरपंच अभिषेक गायकर, शशी गंभीर, उदय आवारी, चेतन शेलार, राजा बोराडे, समीर बोराडे, नरेंद्र पवार, भाऊ म्हसकर, हेमंत बडेकर, संजय पालकर, गणपत बोराडे, संतोष पालकर, चंद्रकांत तिखंडे, स्वप्नील मुंढे, उमेश जोशी, राहुल जोशी, ऋषिकेश दातार, विशाल जोशी, विशाल गोगटे, तुषार जोशी अश्या अनेक सहकारी यांनी ही मोहीम यशस्वी केली.

कुशीवली ते वेणगाव असा अडीच किलोमीटर हा नाला साफ झाला त्यामुळे पाणी वेणगाव पर्यत आले आहे , वेणगाव जवळ धरण वजा बंधा–यात हे पाणी साठले आहे आता या पाण्याच्या साठ्यामुळे गावातील बोरवेल च्या पाण्याची पातळी वाढेल तसेच उन्हाळ्याच्या दिवसात प्राण्यांना पिण्याच्या पाण्याची सोय झाली आहे.

# खांब नाका पूर्ण बंद ठेऊन पाळला जातोय दिवसभर लॉकडाऊन

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता रोहे तालुक्यातील खांब विभागातील रहिवासी वर्गाचे आरोग्य रहावे यासाठी सोम.दि.२७ एप्रिल ते दि.३ मे पर्यंत संपूर्ण खांब नाकाच बंद ठेवण्याचा महत्वपूर्ण निर्णय येथील स्थानिक प्रशासनाने घेतल्याने येथे उत्स्फूर्तपणे संपूर्ण दिवसभर लाँकडाऊन पाळला जात आहे.

कोरोना महामारीने जगभर अक्षरक्ष:थैमान घातले आहे. त्यामुळे कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण देशभर जमावबंदी आदेशासह लाँकडाऊन पाळण्यात आला आहे.जेणेकरून कोरोनाच्या महामारीपासून देशवासियांची लवकरच मुक्तता होईल.यासाठी शासनाचे निकराचे प्रयत्न चालले आहेत. तर जनतेने थोडे सबुरीने घेऊन घरातच बसून स्वस्थ रहा, महत्वाचे कामासाठीच बाहेर पडा, गर्दी करु नका, आजारी पडल्यास लगेचच



डाँक्टरांकडे जा, नेहमी मास्कचा वापर करा, बाहेरून आल्यानंतर स्वच्छ हात–पाय, तोंड धुऊनच घरामध्ये प्रवेश करा, सोशल डिस्टन्सिंगचे पालन करा या सारख्या सुचनाही प्रसारमाध्यमाद्वारे देऊन कोरोना व्हायरसबाबत प्रबोधन केले जात आहे.

मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गावरील खांब नाकाही या नाक्याच्या आजूबाजूला असलेली गावे, वाड्या, वस्त्या यामुळे नेहमीच गजबजलेला असतो.तर कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी या विभागातील खांब, गोवे, पुगाव, तळवली तर्फे अष्टमी, देवकान्हे आदी ग्रा.पंचायतींनी २४ तास नियंत्रण कक्षाची स्थापना करुन रहिवासी वर्गाचे आरोग्य जोपासले जात आहे. त्याच अनुषंगाने येथील स्थानिक प्रशासन यंत्रणेमार्फत खांब ग्रा.पंचायत कार्यालयात मागील आठवड्यात ग्रा.पंचायत प्रशासन यंत्रणा,रहिवासी व व्यापारीवर्ग यांची महत्वाची बैठक घेऊन

आज दि.२७ एप्रिल ते ३ मे पर्यंत या कालावधीत संपूर्ण खांब नाकाच बंद ठेवण्याचा महत्वपूर्ण निर्णय सर्वानुमते घेण्यात आला आहे. या कालावधीत अत्यावश्यक सेवा म्हणून दवाखाने, मेडिकल व बँका आपल्या ठरलेल्या वेळेत सुरू ठेवण्यात आले आहेत.तर या बंद काळात नागरिकांनीही उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दर्शवित विनाकारण नाक्यावर न फिरता बंदचे पालन करताना दिसत आहेत.

# समाजसेवक व उद्योजक प्रकाश जाधव यांनी सॅनिटायझर व मास्कचे केले वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगडचे पालकमंत्री अदिती ताई तटकरे यांच्या प्रेरणेने तळा येथील सुपुत्र व पुणा स्थित उद्योजक तथा समाजसेवक प्रकाश गोपाळ जाधव यांनी सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून मातोश्री लक्ष्मी गो.जाधव हिच्या स्मृती प्रित्यर्थ कोरोना विषाणूजन्य ससंर्ग संक्रमण रोखण्यासाठी तळा तालुक्यातील जनतेला याचा प्रादुर्भाव होऊ नये या उदात्त हेतूने तळा पोलीसठाणे, पंचायत समिती, सर्व ग्रामसेवक, महसुली विभाग व नागरीकांना मास्क, सँनीटायझर प्रकाश जाधव यांच्या हस्ते वाटप केले.

निरंतर अहोरात्र मेहनत घेऊन कोरोना साखळी तोडण्यासाठी प्रशासन प्रयत्न करीत आहेत याचा जास्त ताण पोलीस प्रशासन महसुली विभागावर येत आहे. पंचायत समिती, महसूल विभाग या शासकीय कर्मचारी योध्दांचा संपर्क मोठ्या



प्रमाणावर येत असल्याने संरक्षण व्हावे यासाठी यांनी छोटासा प्रयत्न केला आहे. नगरसेवक मंगेश शिगवण यांच्या विशेष सहकार्याने पत्रकार किशोर पितळे यांच्या सहाय्याने करण्यात आले.

# माणगाव पोलिसांकडून संजय गांधी निराधार योजनेतील गरजू व्यक्तींना धान्य वाटप

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगाव पोलिसांकडून १ मे महाराष्ट्र दिनी माणगाव तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेतील गरजू व्यक्तींना धान्य वाटप करण्यात आले. यावेळी माणगाव पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक रामदास इंगवले तसेच माणगाव पोलिस ठाण्यातील पोलिस कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये धान्य वाटप करण्यात आले.

माणगाव तालुक्यातील माणगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील निवी, मुठवली, उमरोली,कशेणे, पेण तर्फे तळे, भादाव, विहुले कोंड, रानवडे, नळेफोडी, मांजरवणे, ताम्हाणे इत्यादी गावातील संजय गांधी निराधार योजनेतील गरजू कुटुंबातील वयोवृध्द महिला व पुरुषांना प्रत्येकी ४ किलो तांदूळ, १ किलो कांदे व १ किलो बटाटे असे १०० धान्याचे पॅकेट वाटप करण्यात आले. माणगाव पोलिसांकडून लॉक डाऊनच्या कालावधी मध्ये जनतेची सुरक्षा व कोरोना संबंधीत जनजागृती याकडे संपूर्ण लक्ष केंद्रीत असताना सुद्धा माणगाव पोलिसांकडून समाजातील दुर्बल व अत्यंत गरजू कुंटुबांना त्यांच्या गरजा लक्षात घेऊन धान्य वाटप करीत असून या माध्यमातून माणगाव पोलिसांकडून जनसेवा सुद्धा होत असल्याने सर्व स्तरांतून माणगाव पोलिसांचे अभिनंदन होत आहे.

# गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलने केली गावठी दातभट्टी दारु उद्ध्वस्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोना व्हायरस या रोगाचा प्रादुर्भाव टाळावा याकरिता शासनाने प्रतिबंधीत व पारीत केलेल्या अधिसूचनांचे उल्लंघन करून बेकायदेशीरित्या गावठी हातभट्टी चालवित असल्याची माहिती गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलचे वपोनि पोपेरे यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने घटनास्थळी जावून सदर गावठी हातभट्टी उद्ध्वस्त केली आहे.

तालुक्यातील जावळे गावाच्या हद्दीमध्ये अशा प्रकारे बेकायदेशीरित्या गावठी हातभट्टी चालवली जात असल्याची



माहिती पो.ना.परेश म्हात्रे यांना मिळताच त्यांनी सदर माहिती वपोनि पोपेरे यांना सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनानुसार स.पो. नि.गणेश कराड, पो.ह.सुनील साळुंखे, सचिन पवार, पो.ना.परेश म्हात्रे, सुनील कुदळे, अभय सागळे, मोरे आदींच्या पथकाने सदर ठिकाणी छापा मारुन एकूण २६०० लीटर गावठी दारु तयार करण्याचे रसायन तेथे मिळून आले. सदर रसायन तयार करण्यासाठी लागणारे इतर साहित्य वीजेची मोटार, वीज कनेक्शन वायर असा मिळून जवळपास ६७ हजार ८५० रुपयाचा मुद्देमाल हस्तगत केला असून या प्रकरणी एकाला ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्या विरुद्ध पन–वेल शहर पोलीस ठाण्यात भादवी कलम १८८ सह महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पोलिस शिपायासह पत्नीला कोरोनाची लागण

रुग्णही पुर्णता बरा झाला असून, त्याला घरी सोडण्याच्या प्रतिक्षेत आहे. त्यामुळे उरण तालुका कोरोनामुक्तीच्या दिशेने वाटचाल करीत असतांनाच पोलिस शिपाई व त्याची पत्नी कोरोनाचे बाधित रुग्ण आढळून आल्याने या घटनेची बातमी तालुक्यात वाऱ्यासारखी पसरली असून,सर्वत्र खळबळ माजली आहे.

उरण शहरासह तालुका परिसरातील नागरिकांनी कोरोना संसर्गजन्य विषाणूच्या रोगाची धकधक आत्ता अधिक प्रमाणात वाढली असून, कोरोनाला ठरविण्यासाठी कोणीही विनाकारण न फिरता आपापल्या घरीच थांबून स्वतःचा जीव धोक्यात घालून सर्वांसाठीअहोरात्र तत्परता दाखविणाऱ्या प्रशासनातील आस्थापानांना सहकार्य करावे, असे कळकळीचे आवाहन उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांनी केले आहे.

## करंजाडे परिसरात कर्फ्यू

अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झाल्याचे आपल्या निदर्शनास येत आहे. असे असूनही वसाहतीतील काही नागरिकांनी या आजाराला गांभीर्याने घेतले नसल्याचे केलेल्या गर्दीवरून दिसून येत आहे. या पार्शवभूमीवर मंगळवारी ता. २८ रोजी करंजाडे ग्रामपंचायतीमध्ये बैठक पार पडली होती. यावेळी ग्रामपंचायत स्तरावर घेलेल्या निर्णयानुसार वसाहतीतील किराणा मालाचे दुकानदार, भाजी विक्रेते, फळ विक्रेते, फूल विक्रेते व मेडिकल स्टोअर्स यांना आवाहन करण्यात आले आहे कि येत्या १ मे २०२० ते २ मे २०२० तसेच पुढील जो पर्यंत महाराष्ट्रात, देशात लॉकडाऊन सुरु राहील तोपर्यंत प्रत्येक आठवड्याच्या शुक्रवार व शनिवार असे दोन दिवस ग्रामपंचायत हद्दीतील मेडिकल स्टोअर्स व दवाखाने वगळता इतर सर्व दुकाने (व्यवसाय) बंद राहतील. तसेच शुक्रवार व शनिवार या दिवशी दुध डेअरी सकाळी १० वाजेपर्यंत सुरु ठेवण्याची मुभा देण्यात आली आहे. असा निर्णय ग्रामपंचायतीच्या बैठकीमध्ये घेण्यात आला होता. त्यानुसार लॉकडाऊन हा आपल्या करिताच असल्याने त्याचे सर्वांनी पालन करा, असे आवाहन करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच रामेश्वर आंग्रे, उपसरपंच योगेंद्र कैकाडी, सदस्य व पोलीस पाटील कुणाल लोंढे यांनी नागरिकांना केले होते. त्यानुसार याला दोन दिवसात दुकाने, बाजारपेठेत कडकडीत बंद ठेवण्यात आले होते.

## गावठी दारूची हातभट्टी छापा टाकून नष्ट

(वय–२५) यांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरूद्ध भादवी कलम १८८, २७०, २७१ सह महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) सह आपत्ती व्यवस्थापन अधि.२०५ चे कलम ५१ (ब) सह साथीचे रोग अधि.१८९७ चे कलम ३ अन्वये पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यात ५८, १२५ रू. किंमतीचे कच्चे रसायन, प्लॅस्टिक ड्रम, प्लॅस्टिक कॅन व इतर साहित्य जागीच नष्ट करण्यात आले आहे. तर साडे १४ हजार रूपये किंमतीची १५ लिटर गावठी दारू ३ मोबाईल फोन व इतर वस्तू हस्तगत करण्यात आले आहेत.

## व्यापारी प्रतिनिधींसोबत चर्चा

तसेच विभागनिहाय त्या त्या ठिकाणची मार्केट खुली करून लोकांनी आपापल्या विभागातीलच मार्केटमध्ये खरेदी करावी, असे आवाहन या वेळी करण्यात आले. लोकांच्या आरोग्याच्या दृष्टीने खबरदारी बाळगण्यासाठी उपाययोजना करण्याचेही या वेळी ठरले.

## रूग्ण सेवेत हलगर्जीपणा करणाऱ्यांना घेतले धारेवर

यांनी या विनंतीचा विचार न करता पुढे जाण्याची सुचना करत उपचार करण्यात असमर्थता दर्शवली ,जिल्हा परिषद चे उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती सुधाकर घारे यांना ही बाब समजताच तातडीने प्राथमिक आरोग्य केंद्र आंबिवली येथे त्यांनी भेट दिली असता तेथे सर्व औषध उपलब्ध आहेत व डॉक्टर रमेश कोकरे हे सतत गैरहजर असतात तसेच लहान मुंलाची औषध एक्सपायर डेट संपले ली असून रायगड जिल्हा परिषद तथा आरोग्य सभापती सुधाकर घारे पाहणी करत असताना त्यांच्या निदर्शनात आली.व अधिकारी व कर्मचारी यांना जाब विचारत धारेवर धरले आरोग्य सेवा देण्यात हलगर्जीपणा करणाऱ्या वर कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले,तसेच सरपंच व ग्रामस्थ यांनी डॉक्टर रमेश कोकरे यांची तातडीने बदली करा आणि आम्हाला येथेच राहून २४ तास सेवा देतील अशा डॉक्टर ची येथे नियुक्ति करा अशी मागणी आरोग्य सभापती सुधाकर घारे यांच्याकडे केली.

## जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी

कामे करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या साहित्य निर्मितीचे कारखाने, हे साहित्य विक्री करणारे घाऊक, पुरवठादार दुकाने सुरू करण्याकरिता पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून जिल्हा प्रशासनाने परवानगी दिली आहे.

पावसाळ्यापूर्वीची कामे सुरू करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वरील साहित्यांची उत्पादन/निर्मिती करणाऱ्या कंपन्या/कारखानदारांनी www.permission.midcindia.org या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. या संकेतस्थळावरून वाहनांसाठी पासेस घेण्यात यावेत. याबाबत मान्यता मिळाल्यानंतर संबंधित कंपन्या/कारखानदारांनी कामकाज सुरू करावे व या कंपन्या/कारखाने सुरू ठेवण्यासाठी पुढील अटी व शर्ती लागू राहतील. जिल्हाधिकारी रायगड व आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांनी जाहीर केलेल्या कंटेनमेंट झोन (प्रतिबंधात्मक क्षेत्र)मधून कामगारांची ने–आण करण्यास प्रतिबंध राहील. ज्या कंपन्यांना/कारखान्यांना परवानगी मिळालेली आहे, त्यांचे कामगार, अधिकारी/कर्मचारी यांची कामाच्या ठिकाणी राहण्याची व्यवस्था मालकांनी करावी. कामगारांची वाहतूक एकदाच करण्यास परवानगी राहील. कामाच्या ठिकाणी कामगारांनी शारीरिक अंतर राखणे, मास्क वापरणे, सॅनिटायजर वापरणे, साबणाने हात वारंवार धुणे बंधनकारक राहील. कामगारांची वेळोवेळी वैद्यकीय तपासणी करणे, हॅण्ड सॅनिटायजर, हॅण्ड वॉश इत्यादी सुविधा कामगार, अधिकारी–कर्मचारी यांना पुरविणे, मालकांना बंधनकारक राहील. या कंपन्यांनी/मालकांनी गोडाऊन/दुकानांमधील एकूण कामगारांच्या कमीत कमी कामगारांच्या उपस्थितीत पुरवठा कामे करावीत. माल घेण्यास येणाऱ्या ग्राहकांसाठी गोडाऊन/दुकानाबाहेर उभे राहण्यासाठीचे ठिकाण निश्चित करून ते ठळक रंगांमध्ये आखण्यात यावे.काम करणारे कामगार हे जिल्हाधिकारी रायगड, आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या आदेशान्वये घोषित केलेल्या करोना बाधित क्षेत्रांमधून कुठल्याही परिस्थितीत आलेले नसावेत. भविष्यात या कामाचे क्षेत्र करोना बाधित क्षेत्र घोषित झाल्यास ही परवानगी आपोआप रद्द होईल. आपत्ती व्यवस्थापन, मदत पुनर्वसन विभागाच्या आदेशानुसार विहीत कार्यपद्धतीनुसार संपूर्ण कार्यवाही करावयाची आहे, असे जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी यांनी आदेश दिले आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# माथेरान मधील अनेक विकास कामे अपूर्णावस्थेत

**दै.रायगड नगरी । मुकूंद राजांणे**

**माथेरान** : माथेरान नगरपरिषदे मध्ये शिवसेनेची एकहाती सत्ता स्थापन करण्यात आल्यानंतर गटनेते प्रसाद सावंत यांनी आपल्या परीने बहुतांश विकास कामे मार्गी लावली आहेत.परंतु प्रत्येक प्रभागात असणाऱ्या अपूर्ण तसेच प्रलंबित कामासाठी काही लोकप्रतिनिधी पुढाकार घेतांना दिसून येत नाहीत. त्यामुळे त्या त्या प्रभागातील नागरिकांमधून नाराजीचा सूर उमटताना दिसत आहे.

जर नगरपरिषदेत शिवसेनेचे एकहाती वर्चस्व प्रस्थापित असताना संबंधित लोकप्रतिनिधीनी काहीच कारणे न देता अपूर्ण कामे नगराध्यक्षा तसेच शासकीय अधिकाऱ्यांमार्फत पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक होते परंतु तसे काहीच झालेले नाही. सुरुवातीला नगरसेवक आपल्या दारी ही स्तुत्य कल्पना विद्यमान नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी राबविली होती त्यास उत्तम प्रतिसाद मिळाला होता तदनंतर ही संकल्पना सुध्दा अल्पावधीतच संपुष्टात आली. प्रत्येक प्रभागात जाऊन नागरिकांच्या समस्या अडचणी जाणून घेणे हे संबंधित लोकप्रतिनिधींचे काम असते. परंतु इथे कुठल्याही प्रकारची संकल्पना मार्गी लावण्यासाठी सातत्य नसते. कुठे श्रेयवाद असतो तर कुठे अभिमान त्यामुळेच काही प्रभाग आजही विकास कामांपासून लोकप्रतिनिधीच्या दुर्लक्षामुळे मागे पडले आहेत. काही ठिकाणी वस्तीच्या भागात अस्वच्छता दिसून येत आहे तर काही ठिकाणी नागरिकांनी सातत्याने संबंधित लोकप्रतिनिधीना प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी त्यांच्याकडे तगादा लावला आहे तरीसुद्धा ही नागरिकांना अभिप्रेत असणारी कामे पूर्ण होऊ शकली नाहीत.प्रभाग क्रमांक सहा मध्ये सुध्दा अनेक कामे आजही प्रलंबित राहिली आहेत. सुलभ शौचालय वरील पत्र्याचे शेड केव्हाच उडून गेले आहे, महिलांची शौचालय डबघाईला आलेली आहेत. याच परिसरात राहणाऱ्या नागरिकांच्या घरालगत ड्रेनेजचे दुर्गंधीयुक्त घाण पाणी सतत वहात आहे त्यामुळे या भागातील लोक या दुर्गंधीचा सामना करत आपले जीवन कंठीत आहेत. सुरक्षा रेलिंगची कामे अपूर्ण अवस्थेत आहेत.

याच भागात एक देऊळ असून त्याची खूपच दुरवस्था झाली आहे त्याची सुध्दा दुरुस्ती करणे, त्याचप्रमाणे संत गाडगे महाराज रोड वरील जुने पेव्हर ब्लॉक काढण्यात आले आहेत ते तरी या देवळाच्या परिसरात लावण्यात यावेत अशीही मागणी युवा वर्ग करीत आहेत.

एवढेच नव्हे तर कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विविध प्रभागात नागरिकांच्या सुरक्षेसाठी सॅनिटायझर,साबण, मास्कचे मोफत वाटप काही नगरसेवकांनी केले होते परंतु प्रभाग सहा मधील नागरिक या सुविधेपासून वंचित राहिले आहेत. प्रत्येक लोकप्रतिनिधीचा प्रभाग हे त्यांचे निदान पाच वर्षांसाठी एकप्रकारे कुटुंब असते या कुटुंबातील नागरिकांना काय समस्या, अडचणी येत आहेत त्या जाणून त्याचा पाठपुरावा करणे हे संबंधित नगरसेवकांचे कर्तव्य असते त्यासाठी नेहमीच जागरूक राहणे अपेक्षित असताना सर्व नागरिकांचा भ्रमनिरास होत आहे यासाठी निदान पुढील उर्वरित काळात तरी अपुरी असणारी विकास कामे मार्गी लागतील याच एकमेव आशेवर इथले नागरिक आहेत.



## शासनाकडून कोरोना विषाणूवर आळा घालण्यासाठी विविध प्रतिबंधात्मक उपाय जारी

**दै.रायगड नगरी । पद्माकर उभारे**

**माणगाव** : कोरोना विषाणूचा संसर्ग व वाढता प्रभाव रोखण्यासाठी व त्याला आळा घालण्यासाठी शासनाकडून विविध प्रतिबंधात्मक उपाय जारी केले आहेत.

रायगड जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या आदेशानूसार सदरची माहिती जिल्ह्यातील, तालुक्यातील प्रत्येक शासकिय कार्यालयात देण्यात आली आहे.कोव्हीड १९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सार्वजनिक ठिकाणी मास्क अथवा रुमाल न वापरल्यास त्या व्यक्तीकडून ५०० रुपये दंडनीय रक्कम वसूल करण्यात येईल. तसेच सार्वजनिक ठिकाणी (रस्ते, बाजार, रुग्णालय, कार्यालय ) इत्यादी ठिकाणी थुंकल्यास ५०० रुपये दंड, सर्व दुकानदार, फळे, भाजीपाला विक्रेते आणि ग्राहक यांनी सामाजिक अंतर( सोशल डिस्टन्सिंग ) न राखल्यास, ( दोन ग्राहकांमध्ये ३ फूट अंतर न राखणे, विक्रेत्यांनी मार्किंग न करणे ) अशा वेळेस ग्राहक व्यक्तीस २०० रुपये दंड व आस्थापना मालक, दुकानदार, विक्रेता यांस १००० रुपये दंड आकारण्यात येईल असा आदेश शासनाकडून जारी करण्यात आला आहे.

अशा प्रकारचे वर्तन कोणत्याही व्यक्तीकडून दुसऱ्यांदा झाल्यास सदर व्यक्ती दंडास तसेच भा.दं.वि. कलम१८८, २६९ व २७० सह महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ मधील कलम ११५ नूसार फौजदारी कारवाईस पात्र ठरेल. सदर आदेशाची अंमलबजावणी प्रत्येक कार्यक्षेत्रात प्रभावीपणे होईल या दृष्टीने उचित उपाययोजना कराव्यात व त्याबाबत संबंधितांना निर्देश द्यावेत असा आदेश शासनाकडून जारी करण्यात आला आहे.

## पिडिलाईट कंपनी व टि.आय.ए.च्या वतीने तळोजा पोलिसांना पीपीई किट वाटप

**दै.रायगड नगरी । तळोजा**

संपूर्ण नवी मुंबई मधील पोलिस कर्मचारी सध्या आपला जीव मुठीत घेवून जनतेच्या सेवेसाठी अहोरात्र मेहनत घेत आहेत. त्यांची हि सुरक्षा तितकीच महत्वाची आहे जेवढी जनतेची. जनतेचा पोलिस कर्मचारी सुरक्षित तर जनता सुरक्षित राहू शकते. या हेतुने नवी मुंबईतील पोलिस आयुक्तालयाच्या अधीन असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांना वैयक्तिक संरक्षणात्मक किट वितरित करण्यासाठी भारत आधारित ॲडव्हाईज मॅन्युफॅक्चरिंग कंपनी पिडिलाईट इंडस्ट्रीज जी फेविकॉल आणि फेविक्विक ब्रँडसाठी प्रसिद्ध आहे. तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष सतीश शेट्टी यांनी पिडिलाइट उद्योगांच्या वतीने तळोजा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक काशिनाथ चव्हाण यांच्याकडे १८० वैयक्तिक संरक्षक किट हस्तांतरित केल्या. तसेच डिसीपी झोन २ मध्ये अशोक दूधे यांच्याकडे ५८० वैयक्तिक संरक्षण किट सुपूर्द करण्यात आल्या. तसेच संपूण नवी मुंबई व पनवेल परिसरात पाच हजार वैयक्तिक संरक्षण किट येत्या दोन दिवसात वितरित करणार असल्याचे सतिश शेट्टी यांनी म्हटले आहे. टीआयएने माहिती दिली की प्रत्येक संरक्षक किटमध्ये १० फेस मास्क, २ हातचे दस्ताने, १ सॅनिटायझर, इत्यादी साहित्याचा समावेश होता.



तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनने (टीआयए) तळोजा एमआयडीसी मधील उद्योगांना संपर्क साधून तळोजा एमआयडीसी मधील गरीब लोकांसाठी अन्नधान्याच्या पिशव्या खरेदी व वाटप करण्यात मदत करणे. कोविड १९ ला लढा देण्यासाठी आवश्यक असलेल्या वैद्यकीय उपकरणे / तरतुदींच्या खरेदीसाठी मदत करणे या साठी उद्योजकांनी पुढे येण्याची आव्हान केले होते. त्या आवाहनाचा आधार घेऊन, तळोजा एम.आय. डी. सी. मधील पिडिलाइट इंडस्ट्रीज लिमिटेड पुढे आले आणि त्यांनी नवी मुंबई पोलिस आयुक्तालयाला वैयक्तिक संरक्षक किट वाटप करण्याची इच्छा टि.आय.ए.चे अध्यक्ष सतीश शेट्टी यांच्याकडे केली. त्यानंर टि.आय.ए चे अध्यक्ष सतिश शेट्टी यांनी पुढाकार घेवून तळोजा पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक काशिनाथ चव्हाण यांच्याकडे १८० वैयक्तिक संरक्षण किट सुफूद केल्या. तसेच डीसीपी झोन २ चे अशोक दुधे यांच्याकडे ५८० वैयक्तिक संरक्षण किट सुपूर्द करण्यात आल्या. यावेळी बाबू जॉर्ज, प्रोप्रायटर – बी.जी. एंटरप्राइझ, बीनू पपाचन, मुख्य कार्यकारी अधिकारी बी.जी.इन्टरप्राइझ, टि.आय.ए चे अध्यक्ष सतिश शेट्टी आणिसुनील पाध्ये, कार्यकारी सचिव – टीआयए उपस्थित होते.

## अवकाळी पावसाचा उन्हाळी भातशेतीला तडाखा

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

दोंनच दिवसांपूर्वी कोसळलेल्या अवकळी पावसामुळे उन्हाळी भातश–ेतीला चांगलाच तडाखा बसला असून तयार भातशेती जमिनदोस्त झाली आहे.

डोलवहाल बंधा–याच्या पाण्यावर आधारित काढलेल्या कालव्याद्वारे रोहे तालुक्यात उन्हाळी हंगामात भातश–ेतीचे पिक काढले जात आहे.उन्हाळी भातशेतीमुळे शेतकरी वर्गाला चांगला दिलासा मिळून ब–यापैकी आर्थिक सुबत्ताही आली आहे. त्यामुळे उन्हाळी हंगामातील भातशेती पिकविणे शेतकरी वर्गाच्या द्रुष्टीने फायदेशीर ठरू लागली आहे.



कालव्याच्या पाण्यावर आधारित भातशेती पिकविणे फायदेशीर ठरू लागल्याने शेतकरी वर्गाचा कलही उन्हाळी भातशेती पिकविण्यावर दिसून येत आहे. परंतू शेती व शेतकरी वर्गावर अधून मधून येणाऱ्या संकटांचा विचार करता काहीवेळा उन्हाळी भातशेती पिकविणे म्हणजे मोठेच कष्टाचे होऊन जाते.तर दोनच दिवसांपूर्वी वादळी वा–यासह कोसळलेल्या अवकळी पावसाने तयार होण्याच्या स्थितीत असलेली भाताची रोपे जमिनदोस्त झाल्याने शेतकरी वर्ग चांगलाच हवालदिल झाला असून आर्थिक संकटात सापडला आहे. अशावेळी शासनातर्फे लवकरात लवकर नुकसानग्रस्त भातशेतीचे पंचनामे करून शेतकरी वर्गाला नुकसानभरपाई मिळवून देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## सुधागड तालुक्यातील वासुंडे ग्रामस्थांकडून धान्य दान

**दै.रायगड नगरी । गौसखान पठाण**
**सुधागड/पाली**

करोनाच्या संकटामुळे अनेक कुटुंबीयांना उपासमारीची वेळ आली आहे. अनेक परप्रांतीय मजुरांना हाताला काम नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. शासन आपल्याला दर महिन्यातला धान्य देत आहे त्याचा लाभ आज आपण प्रत्येक जण घेत आहे, परंतु आज अनेक कुटुंब आहेत त्यांना शासनाचा लाभ मिळत नाही. करोनामुळे अनेक कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली आहे. या सर्व बाबींचा विचार करुन सामाजिक बांधिलकी जपत माणगांव बुद्रुक ग्रामपंचायतीकडे हद्दीतील वासुंडे गावातील ग्रामस्थांनी जे उपक्रम राबवले आहे.ते एक प्रेरणा दायकच आहे.आज आपण तुझं माझं न करता वाटून खाण्याचे दिवस आहेत. जे आज आपल्याकडे आहे. त्यातला मूठभर भाग आता इतरांना दिले पाहिजे या भावनेने वासुंडे ग्रामस्थांनी व वासुंडे येथील रास्त भाव धान्य दुकानदार हरिचंद्र पाटील यांनी



आप आपल्या परीने जे होईल ते धान्य आमदार रविद्रं पाटिल व सुधागड–पाली तहसिलदार दिलिप रायण्णावार यांच्या उपस्थित गोर गरीब व गरजु लोकांसाठी दान केले.

यावेळी प्रसंगी बोलताना आमदार रवींद्र पाटील यांनी वासुंडे ग्रामस्थ व रेशन दुकानदार हरिश्चंद्र पाटील यांचे कौतुक केले. तर एका बाजूला रेशन दुकानदार बाबत अनेक तक्रारी येत असताना काही रेशन दुकानदार चांगले काम करतात हे सुद्धा या धान्य दान कार्यक्रमानिमित्त सिद्ध झाले आहे. वासुंडे गावा प्रमाणे इतर गावातील ग्रामस्थांनी अशा प्रकारचा उपक्रम राबवले पाहिजे. वासुंडे येथे धान्यदान कार्यक्रमाच्या निमित्त बोलता सुधागड–पाली तहसिलदार दिलिप रायण्णावार बोलताना व्यक्त केले. यावेळी आमदार रविद्रं पाटील ,सुधागड तहसीलदार दिलीप रायण्णावार, भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा,माणगाव बुद्रुक ग्रामपंचायत उपसरपंच विलास पालवे, जांभुळपाडा ग्रामपंचायत उपसरपंच राजेश शिंगाडे, माजी सरपंच गणेश कानडे ,माणगाव बुद्रुक ग्रामसेवक के. पी. पवार यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कुरियरद्वारे २० हजार मास्क पाठविण्याचा बहाणा करुन व्यावसायिकाकडून सव्वा दोन लाख रुपये उकळले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कुरीयरद्वारे २० हजार तोंडाला लावण्याचे मास्क पाठविण्याचा बहाणा करुन एका भामट्याने कोपरखैरणेतील व्यावसायीकाकडून सव्वा दोन लाख रुपये उकळून त्याची फसवणुक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. व्यावसायीकाने दिलेल्या तक्रारीनंतर कोपरखैरणे पोलिसांनी या प्रकरणातील भामट्या विरोधात फसवणूकीचा गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

या प्रकरणातील तक्रारदार विकास भोईर हा व्यावसायीक कोपरखैरणे येथे कुटुंबासह रहाण्यास असून त्याचा प्रयोग शाळेला लागणाऱ्या साहित्यांचा पुरवठा करण्याचा व्यवसाय आहे. सध्या कोरोना या वैश्विक महामारीच्या रोगामुळे तोंडाला लावण्याच्या मास्कच्या मागणीत प्रचंड वाढ झाल्याने भोईर याला आपल्या व्यावसायाच्या अनुषंगाने २० हजार मास्कची गरज होती. त्यामुळे त्याने गत आठवड्यात याबाबतची माहिती आपल्या फेसबुकवर व इंडीयामार्ट या वेबसाईटवर टाकली होती. त्यानंतर हरियाणा येथील निखील शर्मा नामक व्यक्तीने भोईर याला संपर्क साधुन तो एस . आर . एन्टरप्रायझेस कंपनीच्या माध्यमातुन मागणीप्रमाणे तोंडाला लावण्याचे मास्क पुरविण्याचा व्यवसाय करत असल्याचे सांगितले. तसेच मास्कच्या सॅम्पलचे फोटो विकास भोईर याच्या व्हॉट्सॲपवर पाठवून दिले. त्यानंतर भोईर याने २ लाख रुपयांच्या मास्कची ऑर्डर दिल्यानंतर भामट्या निखील शर्मा यांने सांगितल्यानुसार ५० हजाराची रक्कम ॲडव्हान्स म्हणून त्याला पाठवून दिले. त्यानंतर भामट्या निखील शर्मा याने ५० हजाराची रक्कम भेटल्याचे सांगुन त्याने मागविलेले मास्क मिरारोड येथे पाठविण्यात आल्याचे सांगितले. तसेच ऑर्डरची उर्वरीत १ लाख ७५ हजाराची रक्कम भरल्याशिवाय गती एक्सप्रेस हि कुरीयर कंपनी माल ताब्यात देणार नसल्याचे सांगितले. त्यानंतर भामट्या निखील शर्मा याने भोईर याला माल पोहोचविणाऱ्या ड्रायव्हरचा मोबाईल नंबर देऊन त्याला संपर्क साधण्यास सांगितल.

त्यानुसार भोईर याने ड्रायव्हरला संपर्क साधला असता, त्याने सध्या तो सांताक्रुझ पोलीस ठाण्यात कागदपत्र दाखवित असल्याचे सांगितले. यावर भोईर याने त्याला लोकेशन पाठविण्यास सांगितले असता, ड्रायव्हरने ड्रायव्हरच्या बोलण्यावरुन आपल्या मास्कची ऑर्डर आल्याची खात्री पटल्यानंतर भोईर याने भामट्या निखील शर्मा याला १ लाख ७५ हजार रुपये एनईएफटीद्वारे पाठवुन दिले. त्यानंतर भामट्या निखील शर्मा याने त्याची ऑर्डर सायंकाळी ५ वाजेपर्यंत पोहोचणार असल्याचे सांगितले. मात्र सायंकाळी ६ नंतर देखील त्याच्या मालाची ऑर्डर न आल्याने भोईर याने निखील शर्मा व माल घेऊन येण्याचा बहाणा करणाऱ्या ड्रायव्हरच्या मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र दोघांचे फोन बंद असल्याचे आढळून आले. त्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे भोईर याच्या लक्षात आले. त्यानंतर त्याने कोपरखैरणे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## परिमंडळ १ व परिमंडळ २ विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना पोलीस महासंचलनालयातर्फे पोलीस पदक जाहीर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई हद्दीतील परिमंडळ १ व परिमंडळ २ विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना पोलीस महासंचलनालयातर्फे पोलीस पदक जाहीर झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

यामध्ये वपोनि दिनकर मोहिते, पोलीस निरीक्षक शिरिष पवार, सहा. पो.निरीक्षक गंगाधर देवडे, पोलीस हवालदार सुनील कानगुडे, बालाजी थोरात, प्रशांत काटकर, लहू भोसले, अनिल पाटील, चंद्रशेखर भोसले, जितेंद्र म्हात्रे, अनिल यादव, वैभव होले, संभाजी पाटील, अतुल शिंदे व बाबासाहेब काथरे यांना ही पदक जाहीर झाल्याबद्दल त्यांचे पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

## एम.आय.डी.सी चा नागोठण्यातील पाणी पुरवठा झाला सुरळीत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नागोठणे शहरातील बहुतांश भागाला पाणीपुरवठा करणा–या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जलवाहिनीचे दुरुस्तीचे काम आज शनिवारी (दि. २) सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास पुर्ण करण्यात आले. त्यामुळेच नागोठणे शहराचा पाणीपुरवठा आज सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास सुरु करण्यात आल्याची माहिती नागोठणे ग्रामपंचायतीचे सरपंच डॉ. मिलिंद धात्रक यांच्याकडून देण्यात आली.

नागोठणे शहराला पाणीपुरवठा करणारी मुख्य जलवाहिनी येथील अंबा नदीच्या पात्रात काही दिवसांपूर्वी फुटली होती. त्यामुळे या जलवाहिनीवर अवलंबून असलेल्या नागोठणे शहरातील बहुतांशी भागाला कमी दाबाने पाणीपुरवठा होत होता. या जलवाहिनीच्या दुरूस्तीचे काम सरपंच डॉ. मिलिंद धात्रक व उपसरपंच सुरेश जैन यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतीचे मुख्य प्लंबर चंद्रकांत ताडकर, हरेष शिर्के यांच्याकडून इतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने शुक्रवार दि. १ मे रोजी सकाळीच सुरु करण्यात आले होते. या जलवाहिनीच्या दुरूस्ती साठी दोन दिवसांचे शट डाऊन घेण्यात आलेले असतांनाच दुस–या दिवशी सकाळीच जलवाहिनी दुरूस्तीचे हे काम पूर्ण करुन पाणीपुरवठा सुरळीत केल्याने ग्रामपंचायत प्रशासनासह हे काम पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे नागरिकांतून सर्वत्र कौतुक होत आहे.

## अपंश्री ऑटोमेशन प्रा.लि.च्या वतीने पनवेल महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी ५ मशिन करण्यात आल्या सुपूर्द



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आजच्या घडीला कोरोना महामारीमुळे अर्थव्यवस्था अस्थिर झाली आहे. भविष्याचा वेध घेणे कठीण बनले असून या सर्व परिस्थितीची जाण घेवून अपंश्री ऑटोमेशन प्रा.लि.च्या वतीने पनवेल महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी इन्फ्राईड थर्मो मिटरचे ५ पाच मशिन महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

आपले प्रशासन दिवसरात्र झटत आहे. तसेच पनवेल महानगरपालिकचे आयुक्त तसेच त्यांचे कर्मचारी वर्ग देखील कोरोना महामारीवर मात करण्यासाठी प्रयत्नांची पराकष्टा करीत आहेत. या कामाचे कौतुक करतानाच त्यांच्या या कामामध्ये खारीचा वाटा म्हणून पनवेलमध्ये स्थिर असलेल्या अपंश्री ऑटोमेशन प्रा.लि.च्या वतीने पनवेल महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी इन्फ्राईड थर्मोमिटरचे ५ पाच मशिन महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

# नागोठण्यातील मच्छीविक्रेत्यांचे पुन्हा रहदारीच्या रस्त्यावर बस्तान

## नागरिकांची कारवाईची मागणी

**दै.रायगड नगरी । वाकण**

नागोठणे ग्रामपंचायतीकडून येथील मासळी बाजारात बसविण्यात आलेल्या मच्छिविक्रेत्यांनी काही दिवसांपासून आपला मोर्चा पुन्हा एकदा रहदारीच्या रस्त्याकडे वळविला आहे. त्यामुळे अतिशय मेहनत घेऊन ग्रामपंचायत प्रशासनाने मासळी बाजारात बसविलेल्या विक्रेत्यांनी आपले बस्तान पुन्हा रहदारीच्या रस्त्यावर बसविल्याने त्यांच्यावर कारवाईची मागणी होत आहे.

कोरोना विषाणूच्या फैलावामुळे जगभरात दहशत निर्माण झाल्या नंतर नागोठणे कोळीवाड्यातील महत्वाच्या रहदारीच्या रस्त्यावर गेली अनेक वर्षे ठाण मांडून बसलेल्या मच्छी विक्रेत्यांना मासळी बाजारात बसविण्याचे महत्वाचे काम १७ मार्चला नागोठणे ग्रामपंचायतीकडून करण्यात आले होते. त्यामुळे या रस्त्याने अनेक वर्षानंतर मोकळा श्वास घेतला होता. संपूर्ण जगात थैमान घालणाऱ्या कोरोना विषाणूचा फैलाव होऊ नये व आपल्या परिसरातील नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी स्वत: डॉक्टर असलेल्या सरपंच मिलिंद धात्रक यांनी रस्त्यावरील मच्छी विक्रेत्यांना मासळी बाजारच्या इमारतीत बसविण्याच्या



घेतलेल्या या धाडसी निर्णयाचे सर्वत्र स्वागत करण्यात आले होते.

त्यानंतर काही दिवसांनीच कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीने येथील मटन, चिकन व मच्छी विक्रीवर बंदी आणली होती. मात्र चार दिवसांपूर्वीच ही बंदी उठविण्यात आल्यानंतर मटन, चिकन विक्रेत्यांनी मटन मार्केट इमारतीत आपापली दुकाने सुरु केली. मात्र मच्छि विक्रेत्यांनी मासळी बाजारात न बसता पुन्हा एकदा रस्त्यालाच आपली पसंती दिली आहे. सध्या तर कोळीवाड्यातील रस्त्याबरोबरच एस.टी. स्थानकाकडे जाणाऱ्या मुख्या रस्त्यालगत हे मचछीविक्रेते बसु लागले आहेत. त्यामुळे या रस्त्यांवर रहदारीस अडथळा होण्याबरोबरच रस्त्यालगत होणाऱ्या मच्छीच्या घाणीमुळे आरोग्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे. दरम्यान कोरोनाच्या विळख्यातून जनता सुटलेली नसतांनाच पुन्हा एकदा रहदारीच्या रस्त्यावर मच्छी विक्री करण्यास आलेल्या या मच्छी विक्रेत्यांवर ग्रामपंचायत व पोलिस प्रशासन काय कारवाई करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> ग्रामपंचायतीचे कर्मचारी पाठवून रस्त्यावरील मच्छी विक्रेत्यांना मासळी बाजारात बसण्याच्या सुचना आज देण्यात आल्या आहेत. त्यानंतरही मच्छी विक्रेते तेथे न बसल्यास पोलिसंच्या सहकार्यांने त्यांना पुन्हा मासळी बाजारात बसविण्यात येईल
>
> **- डॉ. मिलिंद धात्रक, सरपंच-नागोठणे**

# गावठी दारूच्या भट्टयांवर पेण पोलिसांची कारवाई

**दै.रायगड नगरी । देवा पेरवी/प्रदीप मोकल**

**पेण** : कोरोना या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी देशभरात लॉकडाऊन सुरु आहे. लॉकडाऊनच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्यात दारू दुकानेही बंद असल्याने तळीरामांचे पुरते हाल सुरू असले तरी दुसरीकडे अवैध दारूचा सुळसुळाट झाल्याचे वास्तव आहे.

चोरी छुपी गावठीचे अड्डे सुरू झाले असून, पेण पोलिस ठाण्याच्या पथकाने पेण तालुक्यात धाडसत्र राबवित ३ हातभट्टयांवर कारवाई करत सुमारे ५० हजारांहुन अधिक मुद्देमाल जप्त केला आहे. बिअर बारसह देशी आणि वाईन शॉप बंद असल्याने तळीरामांचे हाल सुरू असतांना, मागील कित्येक महीने बंद असलेल्या गावठीच्या भट्या पुन्हा पेटल्या. देशी विदेशीचे दर गगणाला पोहचल्याने गावपातळीवर नदी नाल्यांबरोबरच दऱ्या खो–यांमध्ये निर्मीती केली जाणारी गावठी दारूने शहरात शिरकाव केल्याने पोलिस प्रशासन सक्रीय झाले आहे. या विभागाने धडाकेबाज कारवाई करीत ३ हातभट्टया उध्वस्त केल्या यात १२०० लीटर रसायन आणि कच्चा माल नष्ट केला असून सुमारे ५० हजारांहुन अधिक मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कारवाई पोलिस उप निरीक्षक नरेंद्र पाटील, सहाय्यक फौजदार तड़वी आणि पो. हवालदार सचिन चौरे यांनी पेण तालुक्यातील महलमिऱ्या डोंगर भागातील बांगलवाडी आणि भोंगोली या भागात करण्यात आली घटनास्थळावरून आरोपीं पोलिसांना गुंगारा देत दऱ्या खोऱ्यात पलायन करण्यात यशस्वी झाले. या कारवाईने हातभट्टी दारु व्यवसाईकांचे धाबे दनानले असून गावठी दारु या तालुक्यातूनच नाही तर संपूर्ण रायगड जिल्ह्यातून समूळ नष्ठ करून आरोपींवर येणाऱ्या काळात कठोर कार्रवाई करण्याचा इशारा पोलिस उपनिरीक्षक नरेंद्र पाटील यांनी दिला आहे.

# सुधागड तालुक्यातील तरूणाची आजाराला कंटाळून आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पाली/वाघोशी**

सुधागड तालुक्यातील कानसळ येथील एका अविवाहित तरूणाने आपल्या स्वतः च्याघरी साडीने गळफास लावून आत्महत्या केल्याचीघटना १ मे रोजी सायंकाळी कानसळ बौध्दवाडी येथे घडली.

नितेश शाम काबंळे (३२)रा. कानसळ बौध्दवाडी असे आत्महत्या करणा या तरूणाचे नाव आहे.

घटनेच्या दिवशी मृतकांच्या परिवारातील सदस्य काही कामा निमित्त बाहेर गेले असता, घरी कुणीच नसतांना सायंकळच्या सुमारास नितेश यांनी आपल्याच घरातील मागच्या बाजूस असलेल्या लोखंडी रॉडला साडीने गळफास लावून आत्महत्या केली. सांयकाळच सुमारास त्यांच्या परिवारातील सदस्य घरी परतले असता त्यांना नितेश गळफास लावल्याच्या स्थितीत आढळला. नितेश याच्या आत्महत्येचे कारण अद्याप अस्पष्ट असले तरी आत्महत्या आजाराला कंटाळून केली असल्याची चर्चा आहे.

# सुनील लोणकर यांना पोलीस महासंचलनालयातर्फे पोलीस पदक जाहीर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रेल्वे विभागात कार्यरत असणारे पोलीस हवालदार सुनील सुदाम लोणकर यांना त्यांच्या उत्तम सेवाभिलेखाबद्दल मा.पोलीस महासंचालक यांचे बोधचिन्ह (पोलीस पदक) जाहीर झाले आहे.



मुंबई रेल्वे पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षम व सदस्य प्रशासनाचे कामात तत्पर असलेले सर्वांना सहकार्य करण्याची भावना व मुंबई रेल्वे आयुक्तालयातील पहिल्या एन्कांऊंटरमध्ये सहभागी असलेले त्याचप्रमाणे आयुक्तालयातील एमपीडीए अंतर्गत कारवाईचा पहिला प्रस्ताव तयार करणारे पोलीस हवालदार सुनील लोणकर यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने उत्तम सेवाभिलेखाबद्दल मा.पोलीस महासंचालक यांचे बोधचिन्ह (पोलीस पदक) जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सहकारी बांधवांना, तसेच नातेवाईकांना व मित्र परिवारांनी अभिनंदन केले आहे.

# रास्त भाव धान्य दुकानातील बायोमेट्रीक धान्य वितरण पद्धतीमुळे दुकानदारांच्या जीवाला धोका

## केंद्र सरकारच्या सतत बदलणाऱ्या नियमामुळे जनतेमध्ये संताप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्रात कोरोनाचे संक्रमण दिवसेंदिवस प्रचंड प्रमाणात वाढत आहे. याच पार्श्वभूमीवर रास्त भाव धान्य दुकानामधून बायोमेट्रीक पद्धतीने धान्य वितरण एप्रिल, मे, जून महिन्यासाठी थांबविण्यात आले होते. शिधा वाटप करताना लाभार्थ्यांची बायोमेट्रीक पडताळणी न करता दुकानदारांनी स्वतः आधार अधिप्रमाणित करण्याची सुविधा देण्यात आली. परंतु मे पासून आता सुविधेत बदल करून लाभार्थ्यांना स्वतः इ–पॉस मशिनवर आपली ओळख पटवून धान्य उचल करण्याचे निर्देश देण्यात आले. यामुळे दुकानात येणाऱ्या प्रत्येकाचे ई पॉस मशिनवर थंब घेवून धान्य वितरण करावयाचे आहे. परंतु या सर्व पद्धतीमुळे रास्त भाव धान्य दुकानदाराला कोरोनाचा प्रादुर्भाव होवून नाहक बळी जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे थंब पद्धत तात्काळ बंद करावी तसेच त्यांना विमा संरक्षण द्यावे अशी मागणी रास्त भााव धान्य दुकान वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष भरत पाटील यांनी केली आहे.

कोरोनाच्या लढाईत आरोग्य सेवक, आरोग्य अधिकारी, डॉक्टर, सफाई कामगार, महावितरण कर्मचारी याचप्रमाणे रास्त भाव धान्य



दुकानदार देखील आपला जीव धोक्यात घालून नागरिकांची सेवा करीत आहे. सरकारकडून कोणतीही सुविधा दुकानदारांसाठी देण्यात आलेली नाही. या आधीच पनवेल तालुक्यातील दोन दुकानदारांना कोरोनाची लागण झाली आहे. ई पॉस मशिनवरील थंब पद्धतीमुळे दुकानदार व नागरिकांना कोरोनाची लागण होण्याची दाट शक्यता असल्याने शासनाने तात्काळ बायोमेट्रीक पद्धत बंद करावी.

तसेच रेशनिंग दुकानदारांना विमा संरक्षण द्यावे व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होण्यापासून वाचवावे अशा आशयाचे निवेदन अध्यक्ष भरत पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना दिले आहे.

# सायकलवरुन परराज्यात जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या ५७ जणांची धरपकड

## परराज्यात जाण्यासाठी सायकल विकत देणाऱ्या ३ दुकानदारांवर देखील गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुंबई, नवी मुंबई परिसरात रहाणाऱ्या परराज्यातील नागरिकांची आपल्या मुळ गावी परतण्याची धडपड अद्याप सुरुच असून पहाटे पनवेल येथून सायकलवरुन उत्तरप्रदेश येथे जाणाऱ्या अशाच ५७ व्यक्तींची तुर्भे एमआयडीसी पोलिसांनी धरपकड केली आहे. पोलिसांनी या सर्वांवर तसेच त्यांना सायकल विकत देणाऱ्या ३ सायकल दुकानदारांवर गुन्हे दाखल केले आहेत. पोलिसांनी या सर्व व्यक्तींना १५ दिवसांचे अन्न धान्य देऊन ते रहात असलेल्या ठिकाणी त्यांना परत पाठवुन दिले आहे.

या प्रकरणात पकडण्यात आलेल्या ५७ व्यक्तींपैकी बहुतांश जण हे पनवेलच्या बम्बई पाडा येथे तर काही तुर्भे इंदिरा नगर भागात रहाणारे आहेत. तसेच हे सर्वजण उत्तर प्रदेश राज्यातील असुन सध्या ते नवी मुंबई–पनवेल भागात विविध ठिकाणी काम करुन आपला उदरनिर्वाह करत आहेत. कोरोनामुळे लॉकडाऊन जाहिर करण्यात आल्यामुळे मागील दिड महिन्यांपासून त्यांचे कामधंदे बंद झाल्याने त्यांची उपासमार सुरु होती. त्यामुळे या सर्व कामगारांनी एकत्र येऊन पनवेलच्या तीन सायकल दुकानदारांकडून सायकल विकत घेतले होते. त्यानंतर बुधवारी पहाटेच्या सुमारास हे सर्वजण सायकलवरुन पनवेल येथुन उत्तरप्रदेश येथे निघाले होते. हे सर्वजण तुर्भे महापे मार्गे पुढे जाणार असल्याने त्यांच्या ताफ्यामध्ये तुर्भे इंदिरा नगरमध्ये रहाणारे काही नागरिक सहभागी होणार होते. त्यामुळे हे सर्वजण सायकलवरुन पहाटे १ वाजण्याच्या सुमारास तुर्भे इंदिरानगर येथे आले असता, त्याठिकाणी बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांनी या सगळ्यांची धरपकड करुन त्यांची चौकशी केल्यानंतर ते सर्वजण उत्तरप्रदेश येथे निघाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर पोलिसांनी ५७ जणांना सायकलसह पोलीस ठाण्यात आणुन कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने त्यांचे अशा पद्धतीने उत्तरप्रदेश येथे जाणे योग्य नसल्याचे त्यांना पटवून दिले. त्यानंतर त्या सर्वांना १५ दिवसांचे अन्न धान्य देऊन ते रहात असलेल्या ठिकाणी त्याना परत पाठवून दिले. या ५७ जणांनी शासनाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याने त्या सर्वांवर तसेच त्याना सायकल देणाऱ्या ३ दुकानदारांवर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# बेकायदेशीररित्या दारु विक्रीसाठी आणलेल्या विदेशी मद्यसाठा गुन्हे मध्यवर्ती कक्ष शाखेने केला हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोना व्हायरस या रोगाचा प्रादुर्भाव टाळावा याकरिता शासनाने प्रतिबंधीत व पारीत केलेल्या अधिसूचनांचे उल्लंघन करून विक्रीसाठी विदेशी मद्यसाठा घेवून आलेल्या एका इसमास मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले असून त्याच्याकडून विदेशी मद्यासह स्कूटी गाडी हस्तगत केली आहे.

मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखा नवी मुंबईचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक एन.बी.कोल्हटकर यांना एक इसम विदेशी मद्याच्या बाटल्या बेकायदेशीररित्या विक्रीसाठी स्कुटी गाडीवरुन घेवून सेक्टर ९ ऐरोली येथे येत असल्याची माहिती त्यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने सदर ठिकाणी सापळा रचून आरोपी किरण रमेश शिवनगी (२५ रा.घणसोली)



याला ताब्यात घेवून त्याच्याकडून विदेशी मद्याच्या १० बाटल्या ज्याची किंमत ३८,३५०/– व स्कूटी गाडी जिची किंमत २५ हजार रुपये इतकी आहे. असा एकूण ६३,३५०/– रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला असून त्याच्याविरुद्ध भादवी कलम १८८, २७०, २७१ सह महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) सह आपत्ती व्यवस्थापन अधि.२०५ चे कलम ५१ (ब) सह साथीचे रोग अधि.१८९७ चे कलम ३ अन्वये रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# पाईप लाईन फुटली ; रहिवाशांवर पाणी टंचाईचे संकट

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

उरण पुर्व विभागातील आवरे, गोवठणे, पाले, पिरकोण, पाणदिवे, सारडे, वशेणी, पुनाडे आदि आठ गावातील रहिवाशांना पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन गुरूवारी ( दि३०) फुटल्याने या गावातील ७ हजार रहिवाशांवर पाणी टंचाईचे संकट ओढावले आहे.त्यामूळे अनेक महिलांनी आपला मोर्चा गाव परिसरातील विहिरी कडे वळविला असल्याचे चित्र पाहावयास मिळत होते.

उरण पुर्व विभागातील आवरे, गोवठणे, पाले, पिरकोण, पाणदिवे, सारडे, वशेणी, कडापे, पुनाडे आदि आठ गावातील रहिवाशांना पुनाडे ग्रामपंचायत हद्दीतील पुनाडे धरणातून पाणीपुरवठा हा या आठ गावातील पाणीपुरवठा कमेटीच्या माध्यमातून गेली अनेक वर्षे करण्यात येत आहे.या आठ गावातील रहिवाशांना लॉंकडाऊनच्या काळावधीत सुरळीत पाणीपुरवठा होत असल्याने गावातील अनेक महिलांनी आपल्या घरातील भांडी,कपडे धुण्याची कामे ही शासनाच्या आदेशाचे पालन करत घरातच केली होती.

मात्र आठ गावातील रहिवाशांना पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन गुरुवारी ( दि२) फुटल्याने लॉंकडाउनच्या काळात सदर आठ गावातील ७ हजार रहिवाशांना पाणी टंचाईचा सामना करावा लागला.त्यामूळे महिलांनी भेडसावणाऱ्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी आपलं आपल्या गावातील तलावाकडे, विहिरी कडे भांडी,कपडे धुण्याकडे आपला मोर्चा वळवला असल्याचे चित्र पाहावयास मिळत होते.

# लॉकडाऊनमुळे श्रीवर्धन तालुक्यात अनेक ठिकाणी घरांची कामे अर्धवट

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

पावसाळा संपल्यानंतर शेतीची कामे आटोपली की नागरिक आपली जुनी झालेली घरे बांधण्यासाठी काढतात. अनेक खेडेगावांमध्ये तसेच श्रीवर्धन शहरात देखील अनेक नागरिकांनी आपल्या घरांचे बांधकाम सुरू केले होते.

यावर्षी पावसाळा लांबल्याने जवळ जवळ डिसेंबर पर्यंत पाऊस पडत होता. त्यामुळे जानेवारी फेब्रुवारीच्या दरम्यान नागरिकांनी घरांची बांधकामे सुरू केली. जुने घर पाडल्यानंतर त्या ठिकाणचा मलबा उचलून नवीन पिलर, फुटींग करेपर्यंत महिन्याचा कालावधी जातो. त्यानंतर स्लॅब टाकून उर्वरित कामे केली जातात. परंतु मार्च महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात देशात लॉकडाऊन जाहीर झाल्यामुळे अनेक नागरिकांची घर बांधण्याची कामे रखडून राहिली आहेत.

एका गावातून दुसऱ्या गावात जाता येत नसल्यामुळे काम करणारे गवंडी, मजूर इत्यादींची कमतरता आहेच. परंतु पावसाळा एक महिन्यावर येऊन ठेपला आहे. जर का पाऊस बरोबर जूनच्या दहा तारखेला सुरू झाला तर नागरिकांनी राहायचे कोठे? कारण ज्यांनी आपले घर बांधायला काढले आहे असे अनेक जण छोट्या खोपटा मध्ये किंवा झोपडे बांधून त्यामध्ये राहत असतात. परंतु पावसाळ्यात कोकणात पाऊस जास्त पडत असल्यामुळे पक्के घर असणे आवश्यकच आहे. तरी शासनाने तीन मे नंतर ज्या ठिकाणी कोरोना रुग्ण नाहीत, अशा ठिकाणचा लॉकडाऊन शिथिल करून राहिलेली घरांची कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी नागरिकांना मदत करावी. अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.